## ॥ श्री ॥
## ॥ बाबा ॥

बाबा वांगणीवाले बाबा वांगणीवाले
बाबांना स्मरुन देह सुखावले
शरीर असून भान नाही राहिले ॥1॥

सा-या गोष्टी करीता बाबांच्या नामे
ध्वनीत गतीत उरकती कामे ॥2॥
बाबा आमुचे मायाळू मनाने दयाळू
जगात येवढा कृपाळू कोणी नाही ॥3॥
कोणी मोठे कोणी लहान बाबांना सर्व समान
श्रीमंत गरीबांत भेद - भाव नाही ॥4॥
बाबा म्हणती लेकरा निष्कर्म न बैसती
कोणे काम नसता खड्डा खणती बुझवती ॥5॥
बैसोनी हो थडग्यावर पुजा की हो केली
बाबा सर्वत्र असण्याची खुण की हो केली ॥6॥
बाबा म्हणती लेकरा करु नको गर्व
मी जगी असण्याचे मान्य कर सर्व ॥7॥
शरण मज येता विसरुनी सर्व
बाबामई करण्याला बाबा समर्थ ॥8॥
बाबा जेव्हा उठोनी काढती आळस
झोपलेल्या मनांना करीती जागृत ॥9॥
बाबा निजले असता निद्रामय न होती
नजर आपल्या भक्तांवर नित्य ठेवती ॥10॥
बाबा आमचे बाबा महान बाबा आमचे बाबा महान
सारी की हो लेकरे कोणी मोठे कोणी लहान ॥11॥
बाबा वृक्षे बाबा झाडे, बाबा झाडे बाबा राने
या झाडाची आम्ही फळे या वृक्षाची आम्ही पाने ॥12॥

★★★★★